# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, ४९,
खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
दूरध्वनी/फॅक्स : २६४७४८९२, २६४७१६१९
ई-मेल –romumbai@dtemaharashtra.gov.in Website www.jdteromumbai.com


**परिपत्रक**

क्रमांक : ४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३/२०१८/ ३७०७
दिनांक : 13 OCT 2018

प्रति,
प्राचार्य / संचालक
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व
विनाअनुदानित पदविका, पदवी
व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

P.V.P.P.C.O.E.
Inward No. 529
Date 15/10/2018

**विषय – उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत " गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजुर करणेबाबत."**

संदर्भ – १ उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र./ २१८/तांशि.-४, दि. ०४.१०.२०१८

२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.का.क.१९/परदेशी शिष्यवृत्ती योजना/२०१८-१९/१४५, दि. ०८.१०.२०१८

**महोदय,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदवीका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी **THE (Times higher Education) / किंवा QS (Quacquarelli symonds) Ranking 200** च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजुर करणेबाबतची योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात येण्यासंबंधीचा **शासन निर्णय दि. ०४ ऑक्टोबर २०१८** रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. **त्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागच्या वतीने जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.**

या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करीता उपरोक्त **दि. ०४ ऑक्टोबर २०१८** रोजीचा शासन निर्णय पहावा. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व माहिती पुस्तिका व वेळापत्रक मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई. यांच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना या योजनेबाबत अवगत करण्यात यावे, तसेच शासन निर्णय तथा संचालनालयाने निर्गमित केलेल्या पत्रानुसार तात्काळ कार्यवाही करुन आपल्या स्तरावरुन या योजनेची जास्तीत जास्त प्रसिध्दी करण्यात यावी.

All HOD's/Dean/
TPO/Scholarship/
Intranet/Website

आपला विश्वासु,

(जितेंद्र. रा. निखाडे)
**सहा.संचालक (तां.)**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

z:\lata ade est 1\lata ade est letters\forwding letters\all institute letters.docx